**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.5 No. 18** **May-June 2024**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य आणि कर्तृत्व

**डॉ. विलास फरकाडे**
श्री समर्थ कला व वाणिज्य महाविद्यालय आष्टी जि. वर्धा
**Corresponding Author - डॉ. विलास फरकाडे**
**DOI- 10.5281/zenodo.11654728**

**सारांश :-**

महाराष्ट्र ही साधूसंतांची भूमी मानली जाते. त्या संतांमध्ये तुकडोजी महाराजांचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. तुकडोजी महाराजांनी लोकांना देवभक्तिबरोबरच देशभक्तीही शिकविली. स्वातंत्र्य प्राप्तीकरिता लोकांमध्ये जागृती निर्माण करून त्यांच्यात राष्ट्राभिमान जागृत केला. तुकडोजी महाराजांनी समाजसेवा हे आपल्यासमोर ध्येय ठेवले होते. त्याच्या पूर्तीकरिता त्यांनी अमरावती जिल्ह्यातील मोझरी येथे " श्री गुरुदेव सेवा मंडळा " ची स्थापना केली. त्यामाध्यमातून त्यांनी संपूर्ण भारतभर नवचैतन्य निर्माण केले. समर्थ रामदास स्वामींप्रमाणे त्यांनी राष्ट्रीय उलाढालीकरिता फार मोलाची मदत केली. त्यांच्याच प्रेरणेने विदर्भात 1930 मध्ये तळेगावचा जंगल सत्याग्रह व 1942 मध्ये छोडो भारत आंदोलनाला गती मिळाली. राष्ट्र कार्यासाठी तुकडोजी महाराजांचा आशीर्वाद आहे या जाणीवेने सर्वसामान्य जनमानस ब्रिटिश सत्तेविरुद्ध एकजुटीने उभा ठाकला. त्यातूनच आष्टी, चिमूर, यावली, बेनोडा यासारखी सत्याग्रह आंदोलनाची प्रकरणे घडली. छोडो भारत चळवळीला विदर्भासह महाराष्ट्रात गतिमान करण्यात तुकडोजी महाराजांचे नेतृत्व आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात उभ्या ठाकलेल्या राष्ट्रीय आव्हानांना मोठ्या धैर्याने तोंड देऊन तुकडोजी महाराजांनी राष्ट्रीय सलोखा व एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी आपले अमूल्य योगदान दिले. याशिवाय सामाजिक ,धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी घडवून आणलेली परिवर्तने अतिशय महत्त्वाची ठरली .त्यांच्या कार्य आणि कर्तृत्वाला भारताच्या इतिहासात तोड नाही. त्यामुळेच राष्ट्राने त्यांना सन्मानाने "राष्ट्रसंत" ही पदवी देऊन त्याचा कार्याचा गौरव केला आहे.

**प्रस्तावना :-**

तुकडोजी महाराजांचा जन्म 29 एप्रिल 1909 रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली येथे झाला.त्यांचे मूळ नाव माणिक बंडोजी ठाकूर असे असून वडील शिवणकाम तर आई मंजुळाबाई दळण कांडन करून आपली उपजीविका चालवीत असे. ठाकूर घराण्याचे कुळदैवत पंढरपूरचा विठोबा असल्याने लहानपणापासून माणिकला ध्यान, भजन व पूजन यांची आवड निर्माण झाली.बालपणापासूनच ध्यानधारणा करणे, कविता, कीर्तन, पोहणे हा त्यांचा छंद असून घोडेस्वारी सारख्या गोष्टी त्यांनी बालपणातच आत्मसात केल्या होत्या. चांदूरबाजारच्या विमलनंदाकडून छंदगायन, यावलीच्या हनुमंत बुवाकडून खंजेरी आणि सातळी पोतळी महाराजांकडून ध्यानधारणा व एकतारी इत्यादी गोष्टी शिकून घेतल्या. बालपणातच माणिकला वरखेडच्या आडकोजी महाराजांचा सहवास लाभला. त्यांच्या सहवासात माणिकचे अंतरंग फुलत गेले. इयत्ता तिसरी मराठी पर्यंत शाळा शिकल्यावर त्यांनी शाळेला रामराम ठोकला. वरखेडच्या आडकोजी महाराजांना त्यांनी गुरु केले तेथेच गुरु आज्ञेने ते स्वकाव्य गाऊ लागले. एके दिवशी गुरु महाराजांनी माणिकला " तुका म्हणे असे किती दिवस म्हणशील ? तुकड्या म्हणे असे म्हणत जा." असा गुरु आदेश दिला. त्यामुळे तुकड्या म्हणे या वाक्याने संपणारे असंख्य अभंग त्यांनी लिहिले. ईश्वरभक्ती आणि सामाजिक जागृती इत्यादी विषय त्यांनी आपल्या भजनातून हाताळले. अशा प्रकारे ते माणिकचा तुकड्या व तुकड्याचा तुकडोजी महाराज बनले. इ. स. 1921 मध्ये तुकडोजी महाराजांचे गुरु आडकोजी समाधीस्थ झाले. तुकडोजीला गुरुविरह असह्य होऊ लागल्यामुळे त्यांनी पंढरपूर गाठले. पंढरपूरच्या

पुंडलिकाच्या दर्शनाने त्यांना मातृ-पितृ सेवेचा पाठ मिळाला. त्यानंतर ते यावलीला परत आले. परंतु ईश्वर दर्शनाची प्रबळ इच्छा असल्यामुळे त्यांनी रामटेकच्या अरण्याची वाट धरली. रामटेकच्या वनात एका योग्याने स्वतःच्या योग गुफेत त्यांना हटयोग शिकविला. त्यानंतर चिमूरच्या कृष्णराव भुते यांनी त्यांना निरीला नेले आणि गोंदळा,ताडोबा,रामगिरीच्या जंगलात तुकडोजीने प्रेमयोग व राजयोगाचा अनुभव घेतला. अशा प्रकारे तुकडोजी विश्व योगी बनले.

**शोधनिबंधाचे उद्देश :-**

1) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कामगिरीचा आढावा घेणे.

2) तुकडोजी महाराजांच्या राष्ट्रभक्तीची व देवभक्तीची चर्चा विषयकरणे.

3) सामाजिक सुधारणा चळवळीत तुकडोजी महाराजांचे योगदान स्पष्ट करणे.

4) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या सर्वांगीण कामगिरीवर प्रकाश टाकणे.

**विषय प्रवेश :-**

तुकडोजी महाराजांनी काशी, प्रयाग, हरिद्वार, पुष्कराज, ओंकारेश्वर, पशुपतिनाथ इत्यादी तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या तसेच वशिष्ठ महाराज, दादाजी धुनिवाले व लहरीबाबा इत्यादी संतांच्या भेटी घेऊन त्यांनी समाज निरीक्षण केले. जनतेमध्ये जागृती निर्माण होण्याकरिता त्यांनी कीर्तन, भजन, यज्ञ आणि प्रवचन इत्यादी साधनांचा अवलंब केला व त्याद्वारे समाजाला एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. देशभक्त, सुशिक्षित, अशिक्षित, गृहस्थ, संन्यस्थ अशा विविध धर्मपंथीयांना एकत्र गुंफण्यासाठी तुकडोजींनी "श्री गुरुदेव" सर्वांपुढे ठेवला. तुकडोजीचे अल्पवय, साधावेश, अध्यात्म तेज, अलौकिक दृष्टी, निरागस बालहस्य, अद्भुत योगानुभव, ढोल, शंख, खंजिरी, एकतारी वाजविण्याचे कौशल्य यासोबतच प्रभावी भजन रचना, दिग्गजांना थक्क करणारी ज्ञानचर्चा अशा तुकडोजीच्या व्यक्तिमत्त्वामुळे प्रचंड लोकसंग्रह घडून आला. अशा प्रकारे संपूर्ण समाजात एक नवी चैतन्याची लाट निर्माण झाली. त्यांनी परंपरागत अनिष्ट रूढी, पंथभेद, अंधश्रद्धा इत्यादी समाज घातक गोष्टींवर प्रहार करून ईश्वराचे विशुद्ध स्वरूप लोकांसमोर मांडले. कीर्तन आणि खंजेरी भजने यांच्या माध्यमातून समाजसेवा करणे हे तुकडोजी महाराजांनी ध्येय ठेवले होते. त्याकरिता समाजकार्याचा एक शिस्तबद्ध समूह त्यांना घडवायचा होता.

महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारच्या विरोधात आधी असहकार चळवळ आणि नंतर सविनय कायदेभंग चळवळ उभारून देशभर ब्रिटिशांच्या विरोधात लोकमत जागृत केले व ब्रिटिशांना भारतातून हाकलून लावण्यासाठी आंदोलने सुरू केली. गांधीजींच्या कायदेभंगाच्या चळवळीत मिठाच्या सत्याग्रहाला प्रचंड प्रतिसाद मिळाला तर इकडे विदर्भात जंगल सत्याग्रहाची लाट उसळली. नागपूर काँग्रेस कमिटीच्या वतीने तळेगाव (श्यामजी पंत) येथे जंगल सत्याग्रहात 1 ऑगस्ट 1930 रोजी सुमारे 30 हजार लोकांनी भाग घेतला. सतत दोन महिने हा जंगल सत्याग्रह प्रवाहित राहिला. यावेळी तुकडोजी महाराजांनी आपल्या खंजिरी भजनाच्या माध्यमातून जनतेला राष्ट्र कार्यासाठी प्रेरित केले. इंग्रज धार्जिना पोलीस अधिकाऱ्यांनी तुकडोजी महाराजांना अटक करण्याचा प्रयत्न केला. परंतु सबळ पुराव्याअभावी त्यांना त्यात सफलता मिळाली नाही. 1933 ला चिमूरचा प्रथम चातुर्मास तुकडोजी महाराजांच्या असामान्य व्यवस्थापन कौशल्याची आणि त्यांच्या क्रांतिकार्याची चूणूक दाखविणारा ठरला. त्याच वर्षी त्यांनी समाजातील जनसमूहाला व्यवस्थित कार्यप्रवृत्त करण्यासाठी गुरुकुंज आश्रम मोझरी येथे श्री गुरुदेव सेवाश्रमाची स्थापना केली. अशाच प्रकारे तुकडोजी महाराजांविषयी आस्था असणाऱ्या तरुणांकडून वर्धा जिल्ह्यातील आष्टी या गावी श्री गुरुदेव आरती मंडळ ही शिस्तबद्ध संघटना उभारण्यात आली.

1930 च्या तळेगाव जंगल सत्याग्रहात हिरीरीने भाग घेतल्यानंतर तुकडोजी महाराजांचा संबंध महात्मा गांधींशी आला. 1936 मध्ये गांधीजींनी तुकडोजी महाराजांना आपल्या भेटीला बोलविले. तुकडोजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वामुळे गांधीजी अत्यंत प्रभावीत झाले. गांधीजींनी त्यांना एक महिनाभर सेवाग्रामला आपल्याजवळ ठेवून घेतले. गांधीजीच्या सहवासात असताना राजेंद्रबाबू, पंडित नेहरू, मौलाना आझाद इत्यादी प्रभूती राष्ट्रनेत्यांशी त्यांचा जवळून संबंध आला. 1941 मध्ये तुकडोजी महाराजांनी युवकांचा स्वतंत्र राष्ट्रधर्म शिक्षण वर्ग हाती घेतला. दर दिवशी कित्येक हजार लोकांना आपल्या प्रभावी भजनातून राष्ट्रसेवेची दीक्षा दिली. 1942 च्या आंदोलनातील तुकडोजी महाराजांचे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे. संपूर्ण विदर्भात महाराजांनी मोठ्या प्रमाणात राजकीय जागृती घडून

लोकांची मने राष्ट्र कार्यासाठी प्रवृत्त केली. त्यांनी आपल्या भजनातून

" झाड झडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना !
पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, नाव लगेगी किनारा!!"

आणि

"अरे काहे को धूम मचाते हो, दुखावकर भारत सारे!
आते है नाथ हमारे, रावण जब जब धूम मचाया!!"

इत्यादी त्यांचे गीत जाज्वल्य देशभक्तीचे प्रतिक होते. तुकडोजी महाराजांची प्रेरणाशक्ती दिली म्हणूनच बेनोडा, यावली, चिमूर, नागपूर, आष्टी या ठिकाणी अभूतपूर्व स्वातंत्र्यलढ्याची प्रकरणे घडली.तुकडोजी महाराज आपल्या पाठीशी उभे आहे व त्यांचा या कार्याला आशीर्वाद आहे हे पाहून सर्वसामान्य गावकरी स्वातंत्र्याच्या होमकुंडात उडी घ्यायला तयार झाले. महाराजांच्या प्रेरणेमुळे विदर्भात फार मोठा संग्राम घडून आला. चिमूर आणि आष्टीच्या स्वातंत्र्यसंग्रामाची जबाबदारी तुकडोजी महाराजांवर टाकून ब्रिटिश सत्तेने त्यांना नागपूर आणि रायपूर येथील तुरुंगात चार महिन्याची शिक्षा दिली तसेच चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यात महाराजांना प्रवेश बंदी केली. तुरुंगातून बाहेर येतात तुकडोजी महाराजांनी भारत व्यापी व विश्वव्यापी नाम सप्ताह गाजवून नवचैतन्य निर्माण केले. नेता विहीन ग्रस्त जनतेला सांत्वना दिली. अशा प्रकारे फार मोठे अद्भुत कार्य महाराजांनी केले.

तुकडोजी महाराज खऱ्या अर्थाने आधुनिक संत होते, समाज सुधारक होते. त्यांनी समाजसुधारणेबरोबर देशभक्तीचे शिक्षणही लोकांना दिले. कीर्तन आणि खंजिरी भजनाच्या माध्यमातून लोक जागृती केली. त्यांनी श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून शिक्षणाचाही प्रसार केला. यासोबतच परंपरागत अनिष्ट रूढी, परंपरा, जाती व्यवस्था, अंधश्रद्धा निवारण, विवाह संघटना, पंथभेद, अनाथांच्या मजुरीसाठी गृह उद्योग इत्यादी स्वरूपाची कार्य चालवली जात असे. या कार्याच्या प्रसारासाठी विदर्भ आणि विदर्भाबाहेरही गुरुदेव सेवा मंडळाच्या शाखा स्थापन करण्यात आल्या. तुकडोजी महाराजांनी आपले जीवन लेखनशक्ती व भक्ति यांचे सर्वसामर्थ्य एकवटून समाज जागृती व त्याच्या प्रगतीचे प्रयत्न केले. आपल्या देशातील झोपी गेलेल्या लोकांमध्ये जागृती व्हावी, त्यांच्यातील अशिक्षितपणा, अस्पृश्यता नष्ट व्हावी, नवीन सुधारणाची आणि सुखी जीवनाच्या स्वप्नाची प्रतिबिंबे त्यांना पडावी तसेच त्यांच्या मागासलेल्या जीवनात चेतना निर्माण व्हावी, त्यांच्या जीवनातील अंधकार दुर व्हावा व सामाजिक, सांस्कृतिक, व्यवहारिक दृष्टीने भाग्यशाली असलेला आपला भारत देश शिक्षण, धनधान्य इत्यादी बाबतीत तितकाच बलशाली व्हावा म्हणून तुकडोजी महाराजांनी श्री गुरुदेव मंडळाची स्थापना करून त्याद्वारे मोठी क्रांती घडवून आणली. ठिकठिकाणी आरती मंडळे व भजन मंडळे स्थापन करून त्याद्वारे गुरुदेव सेवा मंडळ सर्वदूर पोहोचविला.

अमरावती जिल्ह्यात शिक्षणात आपले वेगळे वैशिष्ट्य ठेवणारी एक शिक्षण संस्था म्हणजे अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ हे होय. या संस्थेचे मुख्य कार्यालय मोझरी गुरुकुंज येथे आहे. या संस्थेची स्थापना इ. स. 1943 मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी केली. या संस्थेला त्यांचे मार्गदर्शन लाभले. या संस्थेने शिक्षण प्रसाराबरोबरच सामाजिक कार्याकडे लक्ष दिले. या संस्थेचे ध्येय विश्वबंधुत्वाचा प्रसार, अस्पृश्यतेविरुद्ध आंदोलन, कोरकू सारख्या वनवासींचा विकास, विवाह सुधारणा, गृह उद्योग इत्यादी उपक्रम राबविणे हे होते. त्या संस्थेने आपल्या ध्येयपूर्तीकरिता अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यात शिक्षण प्रसार केला. या मंडळाच्या शाखा सर्वदूर पोहोचलेल्या आहेत. पुणे, इंदोर, अहमदाबाद, झाशी, जालना, औरंगाबाद येथे पाठशाळामधून विद्यार्थ्यांना माणव बनविण्याचे शिक्षण दिले जाते. या संस्थेत गुरुदेव आयुर्वेद विज्ञान महाविद्यालय गुरुकुंज मोझरी येथे असून त्यात आयुर्वेद पारंगत बी. ए. एम. एस. ही पदवी दिली जाते. याशिवाय या संस्थेने चाललेल्या शाळा व ज्युनिअर कॉलेज अनेक ठिकाणी आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वराज्याचे सुराज्य करण्याच्या उद्देशाने सर्वकष राष्ट्रीय कार्यक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी हाती घेतला. 1948 मध्ये सेवाग्रामला भरलेल्या देशी विदेशी शांती दुताच्या मेळाव्यात तुकडोजी महाराजांना पाचरण करण्यात आले. खऱ्या अर्थाने येथूनच त्यांच्या कार्याचा आवाका वाढला. महाराष्ट्रीयन व्यापारी संमेलन, अखिल भारतीय राष्ट्रीय भाषा संमेलन, सर्वोदय संमेलन, अखिल भारतीय सेवा दल संमेलन, भूदान कार्य संमेलन, समाजवादी संमेलन संस्था, विदर्भ साहित्य संमेलन, सर्वोदय संमेलन, अखिल भारतीय सेवा दल संमेलन, नशाबंदी संमेलन, हरिजन संमेलन, भारत सेवक समाज संमेलन इत्यादी अनेक संमेलने तुकडोजी

महाराजांनी आपल्या मार्गदर्शनाखाली गाजविली तसेच पंजाबमधील वेदांत परिषद, नागपूरची महाराष्ट्र मुद्रण परिषद ,अमरावतीची महागाई परिषद, गोंदियाची तमाशा परिषद, आदिवासी युवक प्रशिक्षण कृष्ठरोग निवारण, अखिल भारतीय आयुर्वेदिक महासंमेलन इत्यादी अनेक योजनांना महाराजांनी आश्रय दिला. त्याचप्रमाणे शीख संमेलन, वीरशैव महोत्सव, मुस्लिम महोत्सव अशा सर्व धर्म पंथीयांच्या कार्यक्रमांमध्ये तुकडोजी महाराजांनी उत्साहाने भाग घेतला. त्यासोबतच निजाम राज्याच्या सरहद्दीवर राज्यकर्त्यांच्या प्रतिकारासाठी त्यांनी शक्ती संवर्धन केले. अहेरी संस्थानातील आदिवासी लोकांना त्यांनी मदतीचा हात दिला. उत्तर प्रदेश, पंजाब, मैसूर असे सर्व प्रांत महाराजांनी आपल्या खंजिरी भजनाने गाजविले. अशाप्रकारे सर्व भारतात तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आवाका पसरलेला होता. श्री गुलजारीलाल नंदा यांनी स्थापन केलेल्या भारत साधू समाज या अखिल भारतीय संस्थेचे तुकडोजी महाराज अध्यक्ष होते. पंढरपुरात संत संमेलन भरविण्याचे अवघड कार्य महाराजांनी करून दाखवले. त्याचप्रमाणे गुरुकुंजातील व मुंबईतील सर्वधर्म परिषदा महाराजांनी फार गाजवल्या.तुकडोजी महाराजांना विश्वधर्म परिषदेसाठी 1952 मध्ये अमेरिकेचे निमंत्रण मिळाले तसेच 1958 साली जपानचे सुद्धा निमंत्रण मिळाले होते. त्यामुळे ते या विश्वधर्म आणि विश्वशांती परिषदेला उपस्थित राहिले. तुकडोजी महाराजांनी देशापुढील संकट काळात वेळोवेळी आपले योगदान दिले आहे. 1948 मध्ये दिल्लीच्या निर्वासित शिबिराला त्यांनी दिलासा दिला. त्यासोबतच नागपूरचा हिंदू- मुस्लिम दंगा, पुण्याचा जलप्रलय, कोयना भूकंप अशा प्रत्येक संकटात ते मदतीला धावून गेले. 1962 चे चिनी आक्रमण हटविण्यासाठी संरक्षण निधीला व संरक्षण शाळेला महाराजांनी प्रोत्साहन दिले तसेच 1965 साली पाकिस्तानी आक्रमणाच्या वेळी सीमेचा दौरा करून त्यांनी भारतीय सैन्यात जोष भरण्याचे कार्य केले. याशिवाय सरकारच्या विविध योजना यशस्वी करण्यात हातभार लावला. साने गुरुजींचे मंदिर प्रवेश यज्ञ, विनोबा भावे यांचा भूदान यज्ञ, पंडित नेहरूंची राष्ट्रीय एकात्मता समिती अशा सर्व कार्यांना त्यांनी सामर्थ्य दिले. महाराजांनी अकरा दिवसात तीन लाख अकरा हजार एकर जमीन भुदानात मिळवली. एकेका दिवशी दहा दहा गायत्री मंदिर हरिजनांसाठी त्यांनी खुली केली. गांधी स्मृती प्रित्यर्थ 100 गावे आदर्श केली. आपला जन्मदिवस साजरा करू इच्छिणाऱ्यांना महाराजांनी ग्रामजयंतीसाठी प्रवृत्त केले. त्यात त्यांचा ग्रामगीता हा प्रसिद्ध ग्रंथ आहे. ग्रामगीतेच्या अकराव्या अध्यायात ग्रामीण लोकांच्या दैनंदिन जीवनातील एकही बाब तुकडोजी महाराजांच्या नजरेतून सुटली नाही. आदर्श गाव निर्मितीसाठी सर्वांगीण उपदेश महाराजांनी केला आहे. सर्वसामान्य ग्रामीण माणूस हा विश्वाचा आधार असतो म्हणून तुकडोजी महाराजांनी आपली ग्रामगीता ग्रामाला अर्पण केली आहे. गुरुदेव सेवा मंडळाच्या शाखांचा विस्तार जस जसा वाढत गेला त्या माध्यमातून भारतातील खेड्यांचा विकास कसा करता येईल याची त्यांना सतत तळमळ वाटत होती. गावागावांमध्ये ग्रामसफाई, ग्रामोद्योग, व्यायामशाळा, सहकारी धान्य भांडार, अन्याय प्रतिकारक मंडळ या साधनांच्या माध्यमातून महाराजांनी आदर्श ग्राम निर्मितीसाठी प्रयत्न केले. खेडे आणि त्यातील ग्रामीण जीवन यांच्या उन्नतीच्या ध्यासातून ग्रामगीता या ग्रंथाची निर्मिती झाली आहे. ग्राम जीवनाची, बहुजनाची उन्नती पर्यायाने या देशाची उन्नती हे व्यापक सूत्र ग्रामगीतेच्या मुळाशी आहे. सामान्य शेतकरी असो की वैभवच्या शिखरावर असलेला राजा असो सर्वांना समान शिक्षा देऊन कुटुंब, समाज, राष्ट्र, विश्व सुखी करणे असा उद्देश ग्रामगीतेच्या माध्यमातून स्पष्ट केला आहे. 10 नोव्हेंबर 1968 रोजी गुरुकुंज आश्रम मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे निधन झाले तेथेच त्यांची समाधी आहे.

**निष्कर्ष :-**

महाराष्ट्रात जे साधुसंत होऊन गेलेत, त्यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य विशेष वाखाणण्याजोगे आहे.देवभक्ती बरोबरच त्यांनी देशभक्तीही शिकविली आणि स्वातंत्र्यलढाकरिता लोकांना तयार केले. त्यांच्या या कार्याचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रांने त्यांना राष्ट्रसंत ही पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केलेला आहे. तुकडोजी महाराज एका अर्थाने आधुनिक संत, भक्त, कवी, समाज सुधारक होते. समाज सुधारणा व शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी मोझरी येथे श्री गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली. त्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परंपरा, जातीव्यवस्था, अंधश्रद्धा, अस्पृश्यता निवारण, विवाह संघटन इत्यादी प्रकारचे कार्य केले व या कार्याच्या प्रसारासाठी त्यांनी विदर्भ व विदर्भाबाहेर गुरुदेव सेवा मंडळाच्या शाखा स्थापन केल्या. स्वातंत्र्य आंदोलनातील

तुकडोजी महाराजांचे कार्‌य अतिशय महत्त्वाचे आहे. 1930 च्या सविनय कायदेभंग चळवळ आणि 1942 च्या छोडो भारत आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रसंगी काही काळ तुरुंगवासही भोगला. तुकडोजी महाराजांच्या असंख्य हिंदी मराठी ग्रंथांपैकी त्यांचा ग्रामगीता हा अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. सर्वसामान्य ग्रामीण माणूस विश्वासाचा आधार असतो म्हणून महाराजांनी आपली गीता ग्रामीण माणसाला अर्पण केली. त्यात त्यांनी आदर्श ग्राम निर्मितीसाठी सर्वांगीण उपदेश केला आहे .एकंदरीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य मौलिक स्वरुपाचे आहे. तुकडोजी महाराज खरोखरच राष्ट्रसंत ठरतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्य आणि कर्तृत्वाला प्रणाम व मानाचा मुजरा.!!!

**संदर्भ ग्रंथसुची :-**

1) कडवे, प्रा. रघुनाथ- मानवतेचे महापुजारी राष्ट्रसंत तुकडोजी जीवन व कार्य, अमोल प्रकाशन नागपूर, प्रथमवृत्ती 2012.

2) वक्कानी डॉ.नि.आ.-विदर्भाचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती 1999.

3) कोलारकर, डॉ.श.गो.- आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर , प्रथमावृत्ती 2000

4) पाटील, लीना -महाराष्ट्रातील समाजसुधारक, चित्रा प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती 2001.

5) भंसाली, संदेश -भारतीय समाज सुधारणेचा इतिहास, विश्व प्रकाशन नागपूर, प्रथमवृत्ती 2018.